## प्रसिध्दी पत्रक

**श्री. संतोष मंच्छिंद्र गायके वय ३५ वर्षे, व्यवसाय पोलीस पाटील, नेवरगाव, ता. गंगापुर जिल्हा औरंगाबाद हे ५०००/- रु लाच स्विकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद च्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे नांव हुद्दा व पत्ता | :- | संतोष मंच्छिंद्र गायके वय ३५ वर्षे, व्यवसाय पोलीस पाटील, नेवरगाव, ता. गंगापुर जिल्हा औरंगाबाद. |
| गुन्हयाची वेळ व ठिकाण | :- | दिनांक ०३/०१/२०१९ रोजी नेवरगाव येथे |
| तपासी अधिकारी | :- | श्री.गणेश धोक्रट,पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |
| लाचेची रक्कम मागणी | :- | ५,०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे वाळु वाहतुकीचा ट्रक गावातून चालु देण्यासाठी मासीक हप्ता म्हणून. |

यातील तक्रारदार हे वाळू व्यवसाय करतात, वर नमुद आरोपी लोकसेवक श्री. गायके, पोलीस पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांचे वाळुचे ट्रक नेवरगाव येथून चालु देण्यासाठी स्वत: करिता १०,०००/- रु व तलाठी यांच्याकरिता ५०,०००/- रु मासीक हप्ता म्हणून दि.३०/१२/२०१८ रोजी लाचेची मागणी केली होती. त्यावेळी तक्रारदार यांनी पोलीस पाटील यांच्या मागणी प्रमाणे १०,०००/- रु पैकी ५०००/- रु त्यावेळी आलोसे श्री. गायके पोलीस पाटील यांना दिले होते. परंतु आता त्यानंतर तक्रारदार यांना श्री. गायके, पोलीस पाटील यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ०२/०१/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ०३/०१/२०१९ रोजी श्री संतोष मंच्छिंद्र गायके वय ३५ वर्षे, व्यवसाय पोलीस पाटील, नेवरगाव, ता. गंगापुर जिल्हा औरंगाबाद यांच्याकडे पंचसाक्षीदार समक्ष लाचेची मागणीची पडताळणी केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांचे मासीक हप्त्यापैकी उर्वरीत ५०००/- रु तात्काळ आणून देण्यास सांगून लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांनी सापळा आयोजीत केला असता, संतोष मंच्छिंद्र गायके वय ३५ वर्षे, व्यवसाय पोलीस पाटील, नेवरगाव, ता. गंगापुर जिल्हा औरंगाबाद यांना तक्रारदार यांच्याकडून मागणीप्रमाणे ५०००/- रु लाच घेतांना पंचासमक्ष रंगेहात पकडण्यात आले. आलोसे श्री. गायके यांच्याविरुद्ध पोलीस ठाणे गंगापुर, औरंगाबाद (ग्रामीण) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**Mail ID :-** dyspacbaurangabad@mahapolice.gov.in २) dyspacbabad@gmail.com.

पोलीस उप अधीक्षक कार्यालय ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,औरंगाबाद युनिट